# मंत्रिमंडळ निर्णय

**१ मार्च, २०१६**

**( बैठक क्र. ७० )**

| अ.क्र. | विषय | विभाग |
|---|---|---|
| १ | विधिमंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्यास मंत्रिमंडळाची मंजुरी<br>**सामाजिक बहिष्कारापासून संरक्षणासाठी विधेयक** | गृह |
| २ | सवलतीच्या दराने ९९ वर्षांसाठी होणार भाडेकरार<br>**आयआयएम, एम्स, अभियांत्रिकी महाविद्यालयास नागपूरच्या मिहान प्रकल्पातील जमीन देण्यास मान्यता** | सामान्य प्रशासन |
| ३ | **रोहयोवरील हजेरी सहाय्यकांच्या वेतनश्रेणीत सुधारणा करण्यास मंत्रिमंडळाची मंजुरी** | रोजगार हमी योजना |

<u>विधिमंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्यास मंत्रिमंडळाची मंजुरी</u>

**सामाजिक बहिष्कारापासून संरक्षणासाठी विधेयक**

समाजातील विशिष्ट कुटुंब किंवा अनेक कुटुंबांना वाळित टाकण्याच्या समाजविघातक प्रथेचे उच्चाटन करण्यासाठी महाराष्ट्र सामाजिक बहिष्कारापासून संरक्षण (अटकाव, प्रतिबंध व सुधार) अधिनियम-२०१६ हे विधेयक विधिमंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्यास आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

राज्यातील नागरिकांना एकोप्याने राहता येण्यासाठी तसेच काही भागात घडणाऱ्या सामाजिक बहिष्कारासारख्या अनिष्ट घटनांना प्रतिबंध करण्यासाठी हा नवीन अधिनियम तयार करण्यात येत आहे. गेल्या वर्षी अर्थसंकल्पीय अधिवेशनात सामाजिक बहिष्काराच्या वाढत्या घटनांबाबत विधानसभेत लक्षवेधी सूचना उपस्थित करण्यात आली होती. त्यावेळी या विषयावर झालेल्या चर्चेदरम्यान बोलताना सामाजिक बहिष्कारासारख्या अमानवी प्रथा रोखण्यासाठी शासन कायदा करेल, असे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिले होते. त्यानुसार हे विधेयक सादर करण्यात येत आहे.

सामाजिक बहिष्काराच्या प्रथेचे उच्चाटन करण्यासाठी सध्या प्रचलित असलेले कायदे पुरेसे नाहीत. त्यामुळे नवीन अधिनियम तयार करणे आवश्यक होते. या नवीन अधिनियमानुसार सामाजिक बहिष्कार टाकणे ही कृती गुन्हा ठरविण्यात आली असून ती दखलपात्र आणि जामीनपात्र ठरविण्यात आला आहे. तसेच या गुन्ह्यात दोषी आढळणाऱ्या गुन्हेगारास तीन वर्षापर्यंत कारावास किंवा एक लाखापर्यंत दंड किंवा एकाच वेळी दोन्ही शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे.

या अधिनियमात सामाजिक बहिष्काराची एखादी घटना घडण्याची शक्यता असल्यास त्याबाबत आवश्यक ती प्रतिबंधात्मक कृती करून अटकाव करण्याची तरतूद प्रस्तावित आहे. तसेच बळी पडलेल्या व्यक्तीच्या संमतीने व न्यायालयाच्या परवानगीने शिक्षापात्र अपराध या अधिनियमानुसार आपसात मिटवता येणार आहे.

-----०-----

सवलतीच्या दराने ९९ वर्षांसाठी होणार भाडेकरार

## आयआयएम, एम्स, अभियांत्रिकी महाविद्यालयास नागपूरच्या मिहान प्रकल्पातील जमीन देण्यास मान्यता

ऑल इंडिया इन्स्टिटट्युट ऑफ मॅनेजमेंट (आयआयएम), ऑल इंडिया इन्स्टिटट्युट ऑफ मेडिकल सायन्सेस (एम्स) आणि राज्य शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय या नागपुरातील तिन्ही संस्थांना मिहान प्रकल्पातील अनुक्रमे १४३, १५० आणि ११.६७ एकर जागा सवलतीच्या दराने देण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

आयआयएम संस्थेच्या स्थापनेसाठी नागपूर मिहान प्रकल्पाच्या (Non-SEZ) विशेष आर्थिक क्षेत्राबाहेरील मौजा दहेगाव येथील सेक्टर क्रमांक २० मधील १४३ एकर जमीन तर एम्स संस्थेच्या स्थापनेसाठी याच सेक्टरमधील १५० एकर जमीन १.५ चटईक्षेत्र निर्देशांकाने देण्यात येणार आहे. आयआयएमसाठी राज्य शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत केंद्र शासनाच्या मानव संसाधन विकास मंत्रालयास आणि एम्ससाठी राज्य शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागामार्फत केंद्र शासनाच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयास सवलतीच्या दराने ९९ वर्षाच्या कालावधीसाठी ही जमीन देण्यात येणार आहे. तसेच नागपूरच्या शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या स्थापनेसाठी मिहान येथील सेक्टर २७ येथील खापरी मधील सुमारे ११.६७ एकर जमीन त्यावरील बांधकाम (आय.टी.आय. वसतिगृह व लगतचे मोकळे क्षेत्र त्यावरील शाळेच्या बांधकामासह) आणि मैदान यांच्यासह सवलतीच्या दराने ९९ वर्षांच्या कालावधीसाठी राज्य शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागास हस्तांतरित करण्यास मान्यता देण्यात आली.

नागपूर येथे आंतरराष्ट्रीय प्रवासी व मालवाहतूक हब विमानतळ (मिहान) तसेच विशेष विशेष आर्थिक क्षेत्र (SEZ) विकसित करण्यासाठी विविध कामे मोठ्या प्रमाणात सुरू आहेत. मिहान प्रकल्पाची व्याप्ती आणि भविष्यात होणारी भरभराट विचारात घेऊन केंद्र शासनातर्फे या ठिकाणी आयआयएम आणि एम्स यासारख्या देशपातळीवरील नामांकित संस्था स्थापन करण्यात येत आहेत. शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून शैक्षणिक कार्यक्रम सुरू करण्यात येणार आहेत.

-----o-----

## रोहयोवरील हजेरी सहाय्यकांच्या वेतनश्रेणीत सुधारणा करण्यास मंत्रिमंडळाची मंजुरी

राज्यातील रोजगार हमी योजनेच्या कामावर न्यायालयीन निर्णयानुसार सध्या कार्यरत असलेल्या हजेरी सहाय्यकांना सहाव्या वेतन आयोगानुसार वेतनबँड ४४४०-७४४० अधिक १३०० रूपये ग्रेड वेतन ही वेतनश्रेणी लागू करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

रोजगार हमी योजनेच्या कामावर मजुरी मांडण्यासाठी मजुरांपैकीच एका शिक्षित मजुराची हजेरी सहाय्यक म्हणून १९७८ ला निवड करण्यात आली. त्यावेळी त्यांना १५० रूपये मानधन देण्यात येत होते. त्यात बदल करून १९८९ मध्ये त्यांना ५०० रूपये एकत्रित मानधन देण्यात आले. त्यानंतर त्यात सुधारणा होत गेली. यातील जे हजेरी सहाय्यक २६ मे १९९३ ते ३१ मे १९९३ दरम्यान रोजगार हमी योजनेवर कार्यरत होते त्यांना शासनाच्या गट क व गट ड च्या पदावर सामावून घेण्यात आले. उर्वरितांना ७५०-१२-८७० द.रो.१४-९४० ही असुधारित वेतनश्रेणी लागू आहे. हे वेतन तुटपुंजे असल्यामुळे वेतनश्रेणीत सुधारणा करण्याची मागणी होती. त्यानुसार आज हा निर्णय घेण्यात आला. याचा फायदा २७६ हजेरी सहाय्यकांना होणार आहे. ही वेतनश्रेणी १ जानेवारी २००६ पासून पूर्वलक्षी प्रभावाने तसेच त्यांचे वेतन काल्पनिकरित्या निश्चित करून आदेशाच्या दिनांकापासून देय राहील, मात्र, त्यांना २००६ पासूनची थकबाकी देय राहणार नाही. तसेच त्यांना निवृत्ती वेतनासारखे कोणतेही लाभ मिळणार नाहीत. जे कर्मचारी अगोदरच निवृत्त झाले आहेत त्यांनाही या वेतनश्रेणीचा कोणताही लाभ मिळणार नाही.

-----o-----